# THE MAHARASHTRA STATE CO-OPERATIVE BANKS' ASSOCIATION LTD., MUMBAI

"Shilpin Centre", 40, G.D. Ambekar Road, Wadala, Mumbai - 400 031.
**Tel. :** (022) 2410 6841 / 24106843 * **Fax :** (022) 2410 6841
**E-mail :** mscba@mscba.info * **Web site :** www.mscba.info


Ref. No. : वार्षिक सर्वसाधारण सभा / २६२ / २०२५-२०२६ Date : ०४ जुलै २०२५

## सभेची नोटीस

दि महाराष्ट्र राज्य सहकारी बँक्स् असोसिएशन लि. , मुंबईची ८६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा, **बुधवार, दिनांक २३ जुलै २०२५ रोजी, दुपारी ०३.०० वाजता "यशवंतराव चव्हाण सेंटर, जनरल जगन्नाथ भोसले मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई - ४०००२१"** येथे मा. श्री. सीए भाऊ कड, अध्यक्ष, दि महाराष्ट्र राज्य सहकारी बँक्स् असोसिएशन लि., मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली खालील विषयांवर विचारविनीमय करण्यासाठी आयोजित करण्यात आलेली आहे. कृपया सदर सभेस आपण उपस्थित रहावे, ही नम्र विनंती.

## सभेपुढील विषय

१. मागील दिनांक २३ ऑगस्ट २०२४ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृ-तांत वाचून कायम करणे व ठरावावर झालेल्या कार्यवाहीची माहिती घेणे.

२. असोसिएशनच्या दिनांक ३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा अहवाल, आयव्ययपत्रक व त्या तारखेच्या ताळेबंदपत्रकास मंजूरी देणे.

३. सन २०२५ - २०२६ सालासाठी तयार केलेल्या अंदाजपत्रकास मंजूरी देणे व सन २०२४ - २०२५ सालच्या अंदाजपत्रकातील खर्चाच्या मंजूर रकमांपेक्षा अधिक झालेल्या खर्चास मंजूरी देणे.

४. सन २०२४ - २०२५ चा जमाखर्च मंजूर केल्यानंतर अतिरिक्त शिल्लक रक्कम संस्थेच्या पोटनियम क्र.५१ नुसार राखीव निधीस व उर्वरीत रक्कम इतर निधीस वर्ग करण्यास मंजूरी देणे.

५. संस्थेच्या सन २०२४ - २०२५ सालातील देय रकमांच्या तरतूदीस मंजूरी देणे.

६. संस्थेच्या सन २०२५ - २०२६ सालाकरीता नेमलेल्या अंतर्गत हिशेबतपासनीसांची नेमणूक करणे व त्यांचे मानधन ठरविणे.

७. संस्थेच्या सन २०२५ - २०२६ सालाकरिता वैधानिक लेखापरिक्षकांची नेमणुक करणे व त्यांचे मानधन ठरविणे.

८. सन २०२४ - २०२५ च्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालांची नोंद घेणे.

९. सन २०२४ - २०२५ च्या वैधानिक लेखापरिक्षकांच्या अहवालावरील दोषदुरुस्ती अहवालास मंजूरी देणे.

The Maharashtra State Co-op. Bank's Association Ltd. MUMBAI

१०. असोसिएशनचे पोटनियम क्र. ११ ( ब ) मधील तरतुदीनुसार ज्या बँकांची वार्षिक वर्गणी सतत तीन वर्ष व त्यावरील वर्षाची आलेली नाही त्यांचे सभासदत्व रद्द करुन त्यांची येणे असलेली वर्गणीची रक्कम तरतुदीमधून निर्लेखीत करण्यास मंजुरी देणे.

११. संस्थेच्या सन २०२४ - २०२५ या वर्षाच्या ८६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस हजर नसलेल्या सभासदांच्या अनुपस्थितीस मंजूरी देणे.

१२. मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणा-या विषयावर विचारविनिमय करणे.

कळावे,

आपला विश्वासू

( विजय घोणसे )
सह. मुख्य कार्यकारी अधिकारी

**टिप :-** १. गणपूर्ती अभावी सभा तहकुब झाल्यास ती सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी ठरलेल्या वेळेनंतर अर्ध्या तासाने सुरु होईल. त्यासाठी गणपूर्तीची आवश्यकता असणार नाही.

२. कृपया बॅकेच्या प्रतिनिधींनी सभेस येतेवेळी नोटीसची प्रत आणावी.

३. वार्षिक सर्वसाधारण सभेस येणा-या प्रतिनिधींनी आपली नावे आंम्हास नियोजनाच्या सोईकरिता **शनिवार, दिनांक १९ जुलै २०२५** पर्यंत कळवावी ही विनंती.